**ठळक बातम्या**

- देशाचे ५३ वे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांचा शपथविधी
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दक्षिण आफ्रिकेचा दौरा यशस्वीपणे आटोपून आज मायदेशी परतले
- सहावी आंतरराष्ट्रीय कृषीशास्त्र काँग्रेस आजपासून नवी दिल्ली इथं सुरु
- मुंबईत वाहतुकीचं मोठं जाळं तयार करण्यात सरकारला यश आलं असून पुढच्या पाच ते सात वर्षात मुंबईचा कायापालट करण्याचं उद्दिष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचं प्रतिपादन

आणि

- सुलतान अझलान शाह चषक हॉकी स्पर्धेत भारताची विजयी सलामी

<><><><><>

देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून आज न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी शपथ घेतली. नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिरला, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य यावेळी उपस्थित होते. न्यायमूर्ती सूर्यकांत संवैधानिक, आणि दिवाणी कायदेक्षेत्रातले तज्ज्ञ असून २०१९ पासून सर्वोच्च न्यायालयात न्यायदान करत आहेत. सरन्यायाधीशपदाचा त्यांचा कार्यकाळ १५ महिन्यांचा असेल.

मावळते सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई काल सेवानिवृत्त झाले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दक्षिण आफ्रिकेचा दौरा यशस्वीपणे आटोपून मायदेशी परतले. जोहान्सबर्ग जी-20 शिखर परिषदेच्या यशस्वी आयोजनाचं मोदी यांनी कौतुक केलं असून, राष्ट्राध्यक्ष सिरिल रामाफोसा यांचे आणि दक्षिण आफ्रिकेच्या सरकारचे आभार मानले आहेत. इथं विविध जागतिक नेत्यांशी झालेल्या बैठका आणि संवाद यशस्वी ठरले असून, त्यामुळं विविध देशांशी भारताचे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होतील, असं त्यांनी

समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. या शिखर परिषदेचा काल समारोप झाला. या परिषदेच्या तिसऱ्या सत्रात त्यांनी काल सांगितलं की, तंत्रज्ञान हे मानवकेंद्रित, जागतिक आणि मुक्त स्रोतावर आधारित असायला हवं, 'सर्वांसाठी समन्यायी भविष्य - अत्यावश्यक खनिजं, योग्य काम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता' या संकल्पनेवर हे सत्र आधारित होतं. शाश्वत विकास, विश्वासार्ह व्यापार, निष्पक्ष वित्तपुरवठा आणि सर्वांना समृद्ध करणारी प्रगती आवश्यक आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, प्रधानमंत्री मोदी यांनी जपानच्या प्रधानमंत्री सानी ताकाइची, कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी आणि इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्याबरोबर द्विपक्षीय बैठका घेतल्या.

**<><><><><>**

सहावी आंतरराष्ट्रीय कृषीशास्त्र काँग्रेस आजपासून नवी दिल्ली इथं सुरू झाली. कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते या कार्यक्रमाचं उद्घाटन झालं. तीन दिवसांच्या या कार्यक्रमात चर्चासत्रं, व्याख्यान, युवा शास्त्रज्ञ आणि विद्यार्थी परिषद तसंच प्रदर्शनाचा समावेश आहे. या कार्यक्रमात जगभरातून प्रतिनिधींसह कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, आयसीएआरचे उपमहासंचालक, उद्योग प्रतिनिधी आणि आंतरराष्ट्रीय संघटनांचे तज्ज्ञ आदी एक हजाराहून अधिक लोक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. 'स्मार्ट कृषी-अन्न प्रणाली आणि पर्यावरण संरक्षणासाठी कृषीशास्त्राची पुनर्कल्पना' अशी या परिषदेची संकल्पना आहे.

**<><><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी इस्रायलच्या तीन दिवसीय अधिकृत दौऱ्याचा समारोप करताना इस्रायलचे राष्ट्रपती आयझॅक हर्झोग तसंच प्रधानमंत्री बेंजामीन नेतन्याहू यांची भेट घेऊन चर्चा केली. या दोन्ही बैठकींमध्ये भारत-इस्रायल सामरिक भागीदारी अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. इस्रायलचे राष्ट्रपती हर्झोग यांच्या भेटीत व्यापार आणि गुंतवणूक, विज्ञान-तंत्रज्ञान, नवोपक्रम, तसेच व्यापक आर्थिक सहकार्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. तर प्रधानमंत्री नेतन्याहू यांच्या भेटीत दोन्ही नेत्यांनी व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, संरक्षण, शेती, पाणी व्यवस्थापन आणि नवोपक्रम क्षेत्रांमधे सहकार्य वाढवण्यावर चर्चा करण्यात आली.

**<><><><><>**

अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांच्या नेतृत्वाखाली भारताचं एक शिष्टमंडळ भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष परत आणण्यासाठी भूतानला पोहोचलं आहे. हे अवशेष भूतानने आयोजित केलेल्या जागतिक शांती प्रार्थना महोत्सवासाठी विशेष सन्मान म्हणून पाठवण्यात आले होते. हे अवशेष भूतानच्या ताशिचोदझोंगच्या ग्रँड कुएनरे हॉलमध्ये ठेवण्यात आले होते.

**<><><><><>**

आसामचे स्वातंत्र्यसेनानी हुतात्मा लचित बारफुकन यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. लचित बारफुकन यांची शौर्यगाथा पिढ्यांना प्रेरणा देत राहील, ते धैर्य, देशभक्ती आणि नेतृत्वाचं प्रतीक होते, असं मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

- **- -Byte P.M - - -**

- **<><><><><>**

मुंबईत वाहतुकीचं मोठं जाळं तयार करण्यात सरकारला यश आलं असून पुढच्या पाच ते सात वर्षात मुंबई पूर्णपणे बदलण्याचं उद्दिष्ट आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत आयोजित आयआयएमयूएन मुंबई-२०२५ या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी युवावर्गाशी संवाद साधला. यावेळी युवावर्गासाठीच्या अनेक योजना आणि मुंबईतल्या महत्त्वाच्या प्रकल्पांविषयी मुख्यमंत्र्यानी माहिती दिली. मुंबईतली गर्दी कमी करण्यासाठी पाताललोक म्हणजे भुयारी मार्गांचं मोठं जाळं तयार करण्य़ात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. हे सर्व प्रकल्प २०३२ पर्यंत पूर्ण होतील अशी ग्वाही त्यांनी या कार्यक्रमता दिली.

मुख्यमंत्री इंटर्नशीप योजनेमुळे अनेक तरुणांना रोजगार मिळण्यासाठी मदत झाली, ही योजना राज्यात यशस्वी झाली , त्यामुळे इतर राज्यं सुद्धा ही योजना राबवत आहेत, असं मुख्यमंत्री म्हणाले.

- **- होल्ड बाईट मुख्यमंत्री - -**

- **<><><><><>**

गोव्यात सुरू असलेल्या ५६व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज बालपणाच्या विविध छटा आणि संघर्षाविषयीचे विविध चित्रपट

दाखवण्यासाठी युनिसेफ अर्थात संयुक्त राष्ट्र बालनिधीबरोबर भागीदारी केली आहे. मुलांचे प्रश्न, आव्हानं आणि संधी यांची मांडणी करण्यासाठी इफ्फीत पाच चित्रपट दाखवले जात आहेत. हे सर्व चित्रपट भारत, कोसोवो, इजिप्त, दक्षिण कोरिया अशा विविध देशांचे असून यांमुळे प्रेक्षकांना सांस्कृतिक सीमा ओलांडून लहान मुलांचं जग अनुभवता येईल, असं मनोगत युनिसेफच्या भारतातल्या प्रतिनिधी सिंथिया मॅककॅफ्रे यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात गुवाहाटी इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवसअखेर पहिल्या डावात भारत अजूनही पिछाडीवर आहे. काल दक्षिण आफ्रिकेनं आपल्या पहिल्या डावात ४८९ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेच्या अखेरच्या ४ खेळाडूंनी धावसंख्येत २५२ धावांची भर घातली. सेनुरान मुथुसामी यानं १०९ धावांची शतकी खेळी केली. तर मार्को यान्सनचं शतक थोडक्यात हुकलं. त्यानं ९३ धावा केल्या. भारताच्या वतीनं कुलदीप यादव यानं सर्वाधिक ४, तर बुमराह, सिराज आणि जडेजा यांनी प्रत्येक २ गडी बाद केले. सलग दुसऱ्या दिवशी अंधुक प्रकाशामुळे खेळ थांबवावा लागला तेव्हा भारतानं आपल्या पहिल्या डावात बिनबाद नऊ धावा केल्या होत्या. खेळ पुन्हा सुरु झाल्यावर भारताची फलंदाजी गडगडली.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ७ बाद १७४ धावा झाल्या.

**<><><><><>**

शीखांचे नववे गुरू, गुरू तेग बहादूर यांचा साडेतीनशेवा हुतात्मा दिन आज आहे. गुरू नानक देव यांच्या शिकवणीच्या प्रसारासाठी गुरू तेग बहादूर यांनी देशभर प्रवास केला होता.

**<><><><><>**

मलेशियामध्ये सुरू झालेल्या सुलतान अझलान शाह चषक २०२५ स्पर्धेत काल सलामीच्या सामन्यात भारताताच्या संघानं कोरियावर १-० अशा विजय मिळवला. मोहम्मद राहीलने खेळातला एकमेव गोल केला. भारतीय संघाचा सामना आज बेल्जियमच्या संघाशी दुपारी साडेतीन वाजता होणार आहे.

**<><><><><>**

पुढच्या दोन दिवसात उत्तरप्रदेशच्या पश्चिम भागात दाट धुकं पसरण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. तमिळनाडू, पुद्दुचेरी कराईकलकेरळ, माहे, तसंचअंदमान आणि निकोबार बेटांवर तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

दिल्ली राजधानी क्षेत्रात हवेचा दर्जा खालावलेला असून तिथसा एक्यूआय आज सकाळी ३९६ नोंदला गेला.

//<><><><><>//